पोलीस उप अधीक्षक कार्यालय अँन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद सत्यमेव जयते

दिनांक १९/१०/२०२०

## प्रसिध्दी पत्रक

**आरोपी लोकसेवक अशोक पन्नालाल जैन, अध्यक्ष, द वैद्यनाथ अर्बन को-ऑप बँक,परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांनी १०,००,०००/- रु लाच स्विकारल्याने ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव हुद्दा व पत्ता | :- | अशोक पन्नालाल जैन, अध्यक्ष, द वैद्यनाथ अर्बन बॅंक, परळी वैजनाथ, जिल्हा बीड |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे दिनांक | :- | पोलीस ठाणे परळी शहर, जिल्हा बीड येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| तपास अधिकारी | :- | श्री. गणेश धोक्रट, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | १०,००,०००/- रुपये. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे कॅश क्रेडीट खात्याची मर्यादा अडीच कोटी रुपये मंजुर केल्याचे बक्षीस म्हणुन |
| लाच स्विकृती ठिकाण | :- | आरोपी लोकसेवक यांचे परळी वैजनाथ येथील मोंढयातील धान्य खरेदी विक्रीच्या दुकानात. |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांचा होलसेल किराणा विक्रीचा व्यवसाय आहे. तक्रारदार हे द वैद्यनाथ अर्बन बॅंकेचे खातेदार आहेत. त्यांचे कॅश क्रेडीट खाते असुन त्यानुसार त्यांना अडीच कोटी रुपयांची मर्यादा मंजुर करण्यात आलेली आहे. त्याच्या मोबद्दल्यात बक्षीस म्हणुन तक्रारदार यांना अशोक जैन, अध्यक्ष, द वैद्यनाथ अर्बन को-ऑप बॅंक, परळी वैजनाथ जिल्हा बीड हे १५,००,०००/- रु लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, अशोक जैन यांनी तक्रारदार यांच्याकडे १५,००,०००/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज दिनांक १९/१०/२०२० रोजी सापळा आयोजीत केला असता, अशोक पन्नालाल जैन, अध्यक्ष, द वैद्यनाथ अर्बन बॅंक, परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांनी वरील ठिकाणी तक्रारदार यांच्याकडुन १०,००,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारली व उर्वरित ५,००,०००/- रुपये लाचेची रक्कम नंतर देण्याचे सांगीतले त्यावरुन सदर आरोपींस ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचे विरुद्ध पोलीस ठाणे परळी शहर, जिल्हा बीड येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. श्री. राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. डॉ. अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. गणेश धोक्रट यांनी कारवाई केली आहे. त्यांना पोना विजय ब्राम्हंदे, सुनील पाटील, पोशि मिलींद इप्पर, विलास चव्हाण, चालक बागुल यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID** :-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) spacbaurangabad@mahapolice.gov.in

19/10/2020

**(बी.व्ही.गावडे)**
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग**
**औरंगाबाद.**